


**डॉ. अजित पाटील**

सांगली

dr.ajitpatilsangli@gmail.com


# ‘मी’ नव्हे ‘‘आपण’’

वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापनाच्या ४१ वर्षांत हजारो विद्यार्थ्यांना जीवनाची दिशा देणारे, शब्दांमध्ये कवी, मनात शिक्षक, आणि घरात सहजीवनाचे सौम्य साफल्य साकारणारे, सांगली येथील डॉ. अजित पाटील म्हणजे शांत, अभ्यासू आणि अप्रतिम सर्जनशील व्यक्तिमत्त्व. सहा राज्यांतून आजवर दिलेली ४,४९२ व्याख्याने, हजारो लेख, दहा पुस्तके आणि शेकडो व्हिडिओ यांच्या माध्यमातून त्यांनी ज्ञानाची ज्योत सर्वदूर पोचवली. ‘‘मी नव्हे, आपण’’ या भावनेने पोसलेला त्यांचा प्रवास म्हणजे, अपूर्वाईची भावपूर्ण छटा देणारी प्रेरणा आहे.

*किती सरले विसरून जाऊ,*
*नाही माहीत किती उरले!*
*जीवन ते छान जगले,*
*जे वर्तमानात, वैभवात जगले!*

आपला लाइफपार्टनर आपण एकदा निवडला की, मग तो जसा आपला होतो तसा आपणही त्याचे होऊन जातो. पती आणि पत्नी संसाररूपी रथाची दोन चाकं. दोन्ही चाकं तितकीच महत्त्वाची. कुठलंही चाक कमी किंवा अधिक कधीच नाही. आज आमच्या बाबतीत घडलेल्या एका महत्त्वाच्या, भावना आणि सहजीवन निगडित काही लिहावं वाटलं, म्हणून हा स्मृतीप्रपंच.

## उदात्त निर्णयाची बीजं

एकदा आमच्या एका पाहुण्यांचा मला फोन आला. म्हणाले, आपण डॉक्टर आहात. आम्हाला एक मूल दत्तक घ्यायचं आहे. आपल्या पाहण्यात असं लहान मूल असेल तर आपण सुचवावं. पाहुणे जवळचेच होते. त्यामुळे हा विषय मी माझ्या मिसेस वंदनाला बोललो. आम्ही दोघांनी त्यावर चर्चा केली आणि आपणच आणखी एक चान्स घेऊन त्यांना मूल देऊया का? असा विचार केला. वंदनाची पहिली दोन्ही सिझेरियन ऑपरेशन असल्यामुळे, आधी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यायचं ठरवलं. लगेचच आमच्या जवळच्या गायनॅकॉलॉजिस्टला आम्ही याबाबतीत बोललो. सुरुवातीला त्यांनी आम्हाला वेड्यात काढलं, दोन मुलं असताना तिसरा चान्स कशासाठी घेता? असं त्यांनी विचारल्यावर आम्ही आमचा उद्देश सांगितला. ते दोन मिनिटं खूप गंभीर झाले. म्हणाले, तुमचा हा उद्देश खरोखरच अपूर्व आहे. तुम्ही चान्स घ्या आणि बाकी सगळं माझ्यावर सोपवा. वहिनींच्या प्रकृतीविषयी, डिलिव्हरी विषयी काही काळजी करू नका. आम्हाला डॉक्टरांनी धीर दिल्यानंतर आम्ही त्या पाहुण्यांशी बोललो. त्यांनीही लगेचच होकार दिला.

## कोमल क्षणांची कोमल कंपनं

साक्षात आपल्या पाहुण्यांचेच मूल मिळतं म्हटल्यावर तेही आनंदले. आमची चर्चा झाली – मुलगा किंवा मुलगी जे होईल ते द्यायचे, असे ठरले. कालांतराने वंदनाचं प्लॅन केलेल्या तिसऱ्या बाळाचं सिझेरियन डिलिव्हरी झाली आणि मुलगी झाली. हे बघितल्यानंतर मी थोडासा भावनाविवश झालो. कारण मला बहीण नसल्यामुळे, तसंच मुलगीही नसल्याने पहिल्यापासूनच मुलीची अपेक्षा होती. परंतु मुलगा किंवा मुलगी जे होईल ते द्यावयाचं ठरल्यामुळे आम्ही शब्दाचे पालन केलं.

पहिले काही दिवस ब्रेस्ट फिडींगसाठी मुलगी आमच्याकडे राहिली. सातव्या महिन्यात आम्ही तिच्या नवीन आई-वडिलांच्याकडे तिला सुपूर्द केलं. आमचं म्हणणं होतं की, त्या बाळाला आमची अटॅचमेंट कमीत कमी आणि, नवीन आई-वडिलांची जास्तीत जास्त अटॅचमेंट असावी. पुढे खूप छान पद्धतीने त्यांनी त्या बाळाला वाढवलं. तिला थोडं कळू लागल्यावर त्या पालकांनी आपणहून तिला सर्व सांगून टाकलं. तिलाही खूप आनंद झाला. म्हणाली, ''बाकीच्या सर्वांना एक एकच आई-वडील असतात, मला मात्र दोन आई-वडील मिळाले. मी खरोखरच भाग्यवान आहे! हे ऐकल्यानंतर आम्हांलाही खूप बरं वाटलं.

काळाच्या ओघांत तिला उच्च शिक्षणासाठी काही कारणाने आमच्याकडेच राहावं लागलं. पुढे ती आर्किटेक्ट झाली आणि पुन्हा तिच्या घरी गेली. काय कुणास ठाऊक पण, आमचा

तिच्याशी हा काही वर्षांचा ऋणानुबंधही असू शकेल. आता या गोष्टीला ३० वर्षं होताहेत. छान पद्धतीने ती तिच्या वैवाहिक जीवनामध्ये आपल्या इंजिनिअर नवऱ्याबरोबर अत्यंत सुंदर संसार करते आहे.

## मनाचा अद्वितीय मोठेपणा

अर्थात हे सगळं घडू शकलं ते, केवळ आणि केवळ वंदनाने दाखवलेल्या तयारीमुळे. तिच्या सुंदर मानसिक, भावनिक जडण-घडणीमुळे आम्हाला हे शक्य झालं असं मला वाटतं. सहजीवन, सहअस्तित्त्व, एकरूपता, एकवाक्यता यापेक्षा आणखीन काय वेगळी असू शकते? हे ही एक वेगळं वैभवच आहे, नाही का? पत्नी वंदनाच्या बाबतीत आणखी एक सांगायचं म्हणजे, तिचा मुलांच्या बाबतीतला करिअर ओरिएंटेड दृष्टिकोन. अलीकडच्या काळात मुली खूप शिकत आहेत आणि चांगल्या पद्धतीनं आपलं करिअर करण्यासाठी कष्ट घेत आहेत. वंदनाने आपल्या एका मुलाला डॉक्टर, दुस-याला इंजिनिअर आणि, तिसऱ्याला (दत्तक दिलेल्या मुलीला) आर्किटेक्ट केलं. मात्र बऱ्याच करिअरच्या संधी असतानाही तिने कुठेही स्वतः सर्व्हिस न करता, हे सगळं स्वतःहून ठरवून केलं. माझ्या मते, मुलांना छान घडवण्याचं तिचं हे करिअर खूपच वेगळं अन् अत्यंत महत्त्वाचं आणि मोलाचं आहे.

## वसुंधरेचे तत्त्व : सह-अस्तित्त्व

आत्तापर्यंतचं संशोधन सांगतं की, विश्वातील सर्वात प्रगत ग्रह म्हणजे आपली वसुंधरा. या



वसुंधरेवरील सर्वात प्रगत प्राणी म्हणजे मनुष्य. खरं अक्षय वैभव वर्तमानातच असतं असं मानणाराही मनुष्यच. मात्र बऱ्याच वेळा मागचा पुढचा विचार तो वारंवार करू लागतो आणि हातात असलेलं वर्तमानही तो गमावून बसतो. तरीही समूहाने राहणारा, सहजीवन जगणारा, सहअस्तित्त्व टिकवून ठेवणारा, एकमेकांना सहकारी मानणारा प्राणी हा मनुष्यच.

विवाहरूपी बंधनात दोघेजण एकत्र येतात आणि सहजीवनासाठी बांधले जातात. विवाहपूर्वी एकमेकांचा फारसा परिचय नसणारे दोघेही, विवाहानंतर मात्र हळूहळू एकमेकांना जाणून घेत, एकमेकांत एकरूप होऊन जातात. जशी दुधात साखर विरघळते, तसं त्यांचं एकल अस्तित्त्व विरघळून जातं. दूध छान गोडसर बनतं, तसं त्यांचं जीवनही मधुर होऊन जातं.

## स्वभाव : समजुतीची परिपक्वता

प्रत्येक मनुष्य वेगळा आहे. त्याची प्रकृती, स्वभाव, अस्तित्त्व भिन्नभिन्न आहे. पण स्वभाव म्हणजे ''**स्व**तःची **भा**वनात्मक **व**स्तुस्थिती'' ओळखून, दुसऱ्याच्या स्वभावाला जुळवून घेत, आपल्यातील काही गोष्टी सोडून देणं. त्या सोडून देताना कोणतीही खळखळ, राग, त्रागा न करता सगळं करता आलं तर बरचसं काम सोपं होतं. शिवाय स्वतःमध्ये ज्या कमतरता आहेत, त्या इतरांकडून जाणून घेत असतानाही त्यात कमीपणा न मानणं, यात जो मनाचा मोठेपणा दिसतो, तो खूपच महत्त्वाचा ठरतो. प्रत्येकानं आपली क्षमता आणि मर्यादा जाणून घेतल्या, एकमेकांशी शेअर केल्या तर त्यातून दोघांनाही अनेक चांगले लाभ होताना दिसतात.

## संस्कारांची झळाळी

अशात नुकतीच आमची एक विद्यार्थिनी सांगलीला प्रशासनातील उच्च पदावर बदली होऊन आली. हे मला कळल्यानंतर खूप आनंद झाला. मी तिला भेटायला गेलो. रीतसर बाहेर वेटिंग रूममध्ये बसून मी माझं व्हिजिटिंग कार्ड शिपायाकडे देऊन आत पाठवलं. आत शिपाई व्हिजिटिंग कार्ड देऊन आला, आणि त्याच्या पाठोपाठ मॅडमना लगेचच बाहेर आल्या. मला नमस्कार करीत म्हणाल्या,''सर, तुम्ही आलात, मला खूप आनंद झाला. पण तुम्ही डायरेक्ट आत यायचं ना. व्हिजिटिंग कार्ड कशाला पाठवलं?'' मी म्हणालो - नाही, आता आपण उच्च पदावर आहात. आपला रिस्पेक्ट हा खूप महत्त्वाचा आहे. तो आम्ही सांभाळणं आवश्यक आहे! तिची ही कृती पदावरील उच्चतेपेक्षा अंगी भिनलेल्या संस्कारांची द्योतक होती, असं मला वाटतं.

मी ब्लड बँकेचा डायरेक्टर असल्याने, रक्त संकलनासाठी आम्ही रक्तदान शिबिरं वरचेवर आयोजित करीत असतो. अशाच एका शिबिरात एक मुलगी मला म्हणाली, ''मला रक्तदान करायचे आहे, पण ते टेक्निशियन माझे रक्त घेऊ शकत नाही, असं म्हणतात. मी तिच्याकडे पाहिलं, उंची साधारण, शरीरयष्टी कृश आणि, वजन केवळ ३५ किलो! रक्तदान करण्यासाठी किमान ५० किलो वजन असावं लागतं. त्यामुळे ती रक्तदानाला अपात्र होती. हे सगळं समजावून सांगितल्यानंतर, ती पटकन म्हणाली, ''मग डॉक्टर अर्धी तरी बाटली घ्या ना!'' रक्तदान करून रक्ताची नवी नाती जोडण्याची तिची ही तळमळ खरोखरच वाखाणण्याजोगी होती.

## मोहर ते आम्रफल

थोडक्यात काय तर, आंब्याच्या झाडाला पहिल्यांदा पिवळसर छोट्या छोट्या फुलांच्या रूपानं मोहोर येतो, काही दिवसांत त्याची छोटी-छोटी हिरवी फळं होत जातात. नंतर

हिरव्यागार कठीण थोड्या मोठ्या कैऱ्या होतात. आणि शेवटी छान पिवळसर लालसर मऊ परिपक्व गोड मधुर आंबा तयार होतो. अगदी तसंच आपल्या सहजीवनाचं आहे. कैरीसारखं अधे-मधे कधी आंबट वा कठीण झालं असलं तरी, पुढे जाऊन ते मात्र मधुर आम्रफलात रूपांतरित होतं.

खाणं-पिणं, कपडे-लत्ते, दाग-दागिने, गाडी-बंगला हे जसं आपल्या जीवनामध्ये काही प्रमाणात महत्त्वाचे आहे, तसंच आपलं एकमेकांचं वागणं-बोलणं, रुसवा-फुगवा, चेष्टा-मस्करी, हास्य-विनोद, क्षणभर थबकून परत पुढे जाणं हेही तितकेच महत्त्वाचे आहे. सह-अस्तित्त्वामध्ये सहयोग, सहकार्य हे खूप महत्त्वाचं असतं. जसे आपण एकमेकांच्या आनंदात सहभागी होतो, तसं दुःखातही सहभागी होणं आवश्यक आहे. निश्चितच; आनंद जसा द्विगुणित होतो, तसं दुःख देखील हलकं व्हायला मदत होते. आणि हेच तर आपल्याला जीवनात करायचं असतं! ❑

## कोजागिरीच्या कोनातून..



तुला पाहताना..
मन आभाळागत झाले
निळ्याशार अंतरंगात
जणू पारिजातक उत्स्फूरले !

तुला पाहताना..
शब्दांचे रूपडे पाझरू लागले
हुरहुरणाऱ्या सागरात
जणू रविराज विराजले !

तुला पाहताना..
रानफुलांना पंख फुटू लागले
बहुरंगी उन्हाळ्यात
जणू भावचैतन्य उजळले !

तुला पाहताना..
स्वत्वाचे डोंगर ओघळू लागले
माणुसकीच्या भाऊगर्दीत
जणू आर्जवातील मोती दिसू लागले !

तुला पाहताना..
दिशांचे प्रपंच बहरू लागले
नात्यांच्या मृगजळात
जणू किंतु-परंतु डगमगू लागले !

तुला पाहताना..
स्वप्नांचे मोहोळ उत्करू लागले
अणु-रेणूंच्या विज्ञानात
जणू शरदाचे नाद तरंगू लागले !

**- डॉ. शिवानंद बासरे, नांदेड**

EXIBITION 2025 - SLIDES

## तुझ्या उजेडात माझा ध्यास मुदिता देई नात्याला श्वास

**मुदिता –** म्हणजे सद्गुणांचा आनंद घेणं. जोडीदारातल्या चांगुलपणाचं, त्याच्या प्रयत्नांचं, त्याच्या निर्मळ भावनांचं कौतुक करणं. असं केल्याने नात्यात आदर वाढतो. आणि जिथे आदर आहे, तिथे प्रेम नेहमीच फुलतं. मुदिता ही नात्यातील ऊर्जा वाढवणारी प्रकाशरेषा आहे. मुदिता म्हणजे ''तुझं यश माझंही आहे'' ही शांत भावना. कौतुक हे नात्याचं पोषण असतं; दुर्लक्ष हे उपासमार ठरते. ही भावना नात्यात सकारात्मकता, प्रेरणा आणि उत्साह टिकवून ठेवते. मुदिता ही भावना छोट्या यशांनाही अर्थपूर्ण बनवते.

EXIBITION 2025 - SLIDES

## पश्चात्तापाची सावली शेवटाला सामावली

आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर माणसाला होणारे बहुतेक पश्चात्ताप हे स्वतःशी अप्रामाणिक राहणे, इतरांच्या अपेक्षांनुसार जगणे आणि स्वधर्म न जगल्यामुळे निर्माण होतात. अतीकाम, यश आणि भौतिक सुरक्षिततेच्या मागे धावताना नातेसंबंध, भावना आणि आनंद दुर्लक्षित राहतात. आनंद पुढे ढकलण्याची सवय आयुष्यभर असमाधान वाढवते. समाधान हे स्वधर्म, संतुलित पुरुषार्थ, सत्संग आणि संतोष यावर अवलंबून असते. पश्चात्ताप टाळायचा असेल; तर जाणीवपूर्वक अर्थपूर्ण जगणे हीच खरी जीवनकला आहे.

EXIBITION 2025 - SLIDES

## प्रतिक्रियेआधी श्वास घ्यावा उपेक्षेतून तणाव निवळावा

**उपेक्षा –** म्हणजे अधर्म, चुकीचे वर्तन, अहंकारपूर्ण प्रतिक्रिया किंवा तणाव निर्माण करणाऱ्या क्षणी सुज्ञ संयम राखणं. वाद वाढेल असे वाटल्यावर एक पाऊल मागे घेणं, तिथून तटस्थ होणं ही उपेक्षा. राग वाढवणाऱ्या लोकांपासून अंतर ठेवावं, तसेच राग वाढवणाऱ्या क्षणांपासूनही. ही उपेक्षा नातं वाचवते, चित्ताचा प्रसाद टिकवते. उपेक्षा म्हणजे पलायन नव्हे, तर योग्य वेळेची वाट पाहणं. सर्वच गोष्टींना त्वरित प्रतिसाद देणं हे शहाणपण नसतं. ही संयमाची कला नात्याला जखमा न होता परिपक्व होऊ देते. उपेक्षा प्रतिक्रियेला योग्य दिशा देते.

EXIBITION 2025 - SLIDES

## आसक्ती आणि विरक्ती जीवनयोगाची सांगाती

आसक्ती म्हणजे मी आणि माझे यांच्याशी झालेली अविवेकी एकरूपता. पैसा, नाती, भूमिका यांत गुंतताना; मालकी, सत्ता आणि हिशोब सोडून देण्याची शहाण–पणाची विरक्ती हवी. जीवनातील खरी मुक्तता साठवणीत नव्हे, तर शेअर करण्यात आहे. 'मी'पण हलके झाले की सेवा, समाधान, निवांतपणा प्रकटतो. इच्छा पूर्ण कराव्यात; पण त्यांना चोचले बनवू नये. विश्वस्त वृत्ती, स्थितप्रज्ञता, साधना या माध्यमातून मन नितळ होत जाते. विरक्ती वयावर नाही; जाणिवेवर अवलंबून असते; तिचे फलित म्हणजे करुणामय जीवन होय.